आनंद फक्त बाहेरच्या गोष्टींमध्ये नसतो, तो आपल्या आत आहे.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH

संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले


बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार २८ मे २०२५ | अंक १६५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# सरदार पटेलांचं ऐकलं असतं तर आज दहशतवादी हल्ले पाहायला मिळाले नसते



काँग्रेसने सरदार पटेलांचं ऐकलं असतं तर आज 75 वर्षापासून सुरू असलेल्या दहशतवादी घटना झाल्याच नसत्या, असा दावा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी गुजरात दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी काँग्रेसवर टीका करतानाच पाकिस्तानलाही गंभीर इशारे दिले आहेत. दहशतवाद ही पाकिस्तानची प्रीप्लान युद्धाची नीती आहे. देशाच्या सीमेपलिकडून आम्ही कोणत्याही प्रकारचा दहशतवाद खपवून घेणार नाही, असा इशाराही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला दिला आहे. दहशतवाद्यांच्या बळावर आणि मुजाहिदीनांच्या नावावर पाकिस्तानने भारताचा भाग बळकावला. त्याच दिवशी त्या मुजाहिदींनीना कंठस्नान घातलं असतं आणि सरदार पटेलांचं म्हणणं ऐकलं असतं तर आज 75 वर्षापासून सुरू असलेले दहशतवादी हल्ले पाहायला मिळाले नसते, असं पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले. गांधीनगरमध्ये जनसभेला संबोधित करताना मोदी यांनी हे विधान केलं.तुम्ही युद्धच करत आहात. त्यामुळे त्याला उत्तरही तसंच मिळेल.यावेळी आम्ही कॅमेऱ्यांची व्यवस्था ठेवली होती. कोणी पुरावे मागू नये याची ही खबरदारी होती.1947मध्ये भारताचे तुकडे करण्यात आले. साखळ्या तोडायच्या होत्या. पण इथे तर बाहूच तोडण्यात आले. देशाचे तीन तुकडे करण्यात आले. त्याच रात्री काश्मीरमध्ये पहिला दहशतवादी हल्ला झाला.विकास केल्यावर त्याचे चांगले परिणाम मिळतात हे आपण पाहिलं आहे. आम्ही रिव्हर फ्रंट बनवलं. आम्ही जगातील सर्वात मोठं स्टेडियम बनवलं. आम्ही स्वप्न पाहिलं आणि ते पूर्ण केलं. आम्ही जगातील सर्वात मोठा पुतळा बनवण्याचं स्वप्न पाहिलं आणि ते पूर्णही केलं.काल 26 मे ही तारीख होती. मला 26 मे 2014 रोजी मला पहिल्यांदाच देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेण्याची संधी मिळाली. त्यावेळी भारताची अर्थव्यवस्था 11 व्या स्थानावर होती.आम्ही कोरोनाच्या विरोधातील लढाई लढली. शेजारी देशांनाही झेललं. नैसर्गिक आपत्तीही सोसली. त्यानंतरही आपली अर्थव्यवस्था 11 व्या नंबरवरून चौथ्या नंबरवर आणण्याची किमया आम्ही केली आहे. कारण आम्हाला विकास हवा. प्रगती हवी आहे.येत्या काळात आपल्याला पर्यटनावर भर दिला पाहिजे. गुजरातने तर कमाल केली आहे. कच्छच्या वाळवंटात जाण्याची हिंमत करेल असा विचार तरी करू शकाल का? आज त्याच कच्छच्या वाळवंटात जाण्यासाठी बुकींग मिळत नाहीये. सर्व काही बदलता येऊ शकतं. फक्त इच्छा शक्ती हवी.

## मोदींच्या भाषणातील मुद्दे

6 मे रोजी रात्री जे लोक मारले गेले, त्यांना पाकिस्तानने स्टेट ऑनर दिलं. त्यांच्या ताबूतांवर पाकिस्तानचे झेंडे लावले. पाकिस्तानी सैन्यानेही त्या लोकांना सॅल्यूट केला. यावरून दहशतवादी हल्ले हे काही प्रॉक्सी वॉर नाहीत तर पाकिस्तानची ही ठरवून केलेली युद्धाची रणनीती आहे.

# युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांच्या वतीने बीड शहरात १०१ झाडांची लागवड



प्रतिनिधी | बीड उन्हाळ्यात बीडचा पारा ४४ अंशावर गेल्याने नागरिकांच्या जिवाची लाही-लाही झाली. युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांनी तेव्हाच जिल्ह्यात वृक्षलागवड करण्याचा निर्णय घेतला होता. मे महिन्यात शेवटच्या आठवड्यात चांगला पाऊस पडल्याने त्यांनी चिंच,नारळ,आंबा,जाम,लिंब,वड, पिंपळ यासह सावली, फळ देणारे आणि वर्षानुवर्ष टिकणारे झाडे मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली युवा सेनेचे मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव यांनी लावले. या उपक्रमाबद्दल यांचे सर्व स्तरातून कौतूक होत आहे. बीड जिल्हा हा दुष्काळग्रस्त जिल्हा आहे. वृक्ष कमी झाल्याने त्यात अणखी भर पडली. प्रत्येकानी किमान दोन झाडे लावले पाहिजेत असे फक्त सोशल मीडियावर सेव्ह ठेवले जाते. प्रत्यक्षात मात्र कृतीत ते उतरत नाही. मात्र युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव कसलाही मुहूर्त, कोणतेही कारण, कशाचेही औचित्य न साधता एक सामाजिक उपक्रम राबवला आहे. त्यांनी त्यांनी चिंच,नारळ,आंबा,जाम,लिंब,वड, पिंपळ हे झाडे लिंबाजी जाधव, महादेव मतकर (शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख) विलास मस्के, फुलचंद नेवाळे, प्रसाद चव्हाण, कृष्णा जाधव, सचिन गाडे, गणेश नेवाळे, विश्वनाथ जाधव, रामदास कदम यांच्या उपस्थितीमध्ये लावले. लावलेले प्रत्येक झाड जगवणार आम्ही लावलेले वृक्ष हे एकादा उपक्रम राबवायचा आहे म्हणून लावले नाहीत. लावलेले प्रत्येक झाड जगवण्यासाठी आम्ही मेहनत घेणार आहोत. त्यामुळेच आम्ही चिंच, नारळ, आंबा, जाम,लिंब,वड, पिंपळ यासारखे सावली आणि फळ देणारे झाडे निवडली आहेत. - अविनाश जाधव, युवा सेना मराठवाडा निरीक्षक

# जालनात ढगफुटी सदृश्य पाऊस, त्यात कोल्हापूरी बंधारा फुटला

जालनातील बदनापूर तालुक्यात ढगफुटी सदृश्य पावसाने थैमान घातले आहे. जालना जिल्ह्यातील बदनापूर तालुक्यात मंगळवार सायंकाळपासून मुसळधार पाऊस सुरु असून या पावसाने ओढे नाले नदी यांना पूर आल्याने शेतकऱ्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. याच दरम्यान, पावसाने सुखना नदीवरील कोल्हापूरी पद्धतीचा बंधारा फुटल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे. यात सुखना नदीला मोठा पुर आल्याने बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूंनी पाणी वाहत आहे. शेतांना तळ्याचे स्वरुप जालनाच्या बदनापूर तालुक्यातल्या रोशनगाव-नानेगाव बाजार, वाहेगाव कुसळी आणि यासह आसपासच्या पट्ट्यात आज सायंकाळच्या सुमारास ढगफुटी सदृश्य पाऊस झाला आहे. त्यामुळे या परिसरातील छोटे मोठे ओढे आणि नद्यांनाही मोठा पूर आला आहे. तर शेतकऱ्यांच्या शेतातही तळ्याचे स्वरूप प्राप्त झालं आहे. कोल्हापूरी बंधारा फुटल्याने पूर जालना येथील बदनापूर तालुक्यातल्या नानेगाव या ठिकाणी सुखना नदीवरील असलेला कोल्हापुरी बंधाराही फुटला आहे. पावसाचा जोर अधिकच असल्याने सुखना नदीला पुर येऊन ती दुथडी भरून वाहत आहे आणि पाण्याचा प्रवाह मोठा आणि वेग जास्त असल्याने हा बंधारा फूठला असावा असे म्हटले जात आहे त्यामुळे बंधाऱ्याच्या दोन्ही बाजूंनी पाणीच पाणी वाहत असून नागरिकांची त्रेधातिरपिठ उडाली आहे. पाऊस पुन्हा ब्रेक घेणार ? मुंबई आणि राज्यभरात मान्सूनचे १६ दिवस आधीच आगमन झाल्यानंतर गेले काही दिवसांपासून पावसाने राज्याला झोडपायला सुरुवात केली आहे. मंगळवारी मुंबईत पावसाने विश्रांती घेतली असली तरी राज्यातील लातूर आणि जालना या काही भागात अजून पाऊस सुरुच आहे. या पावसाने मुंबईतील मे महिन्याच्या २६ तारखेला १०७ वर्षातला रेकॉर्ड मोडला आहे. आणखी काही दिवस मोठा पाऊस कोसळण्याचा अंदाज वेधशाळेने व्यक्त केला होता. आता पाऊस थोडा लांबणार असल्याचे भाकित वेध शाळेने केले आहे. अफगाणिस्तान आणि रशियातून येणाऱ्या वाऱ्यामुळे पाऊस थोडा लांबणार असल्याचे म्हटले जात आहे.

# डीनो मोरीया मातोश्रीची सून, तो आदित्य ठाकरेंचा: नितेश राणेंचा खोचक टोला

गेल्या दोन ते तीन दिवसांपासून मुंबईत पाऊस सुरू आहे, पावसामुळे अनेक ठिकाणी पाणी साचल्याचं पाहायला मिळत आहे, यावरून आदित्य ठाकरे यांनी जोरदार हल्लाबोल केला होता, तसेच डीनो मोरीयाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत फोटो असल्याचं देखील त्यांनी म्हटलं होतं, यावरून आता नितेश राणे यांनी आदित्य ठाकरे यांना जोरदार प्रत्युत्तर दिलं आहे, त्यांनी आदित्य ठाकरे यांना खोचक टोला लगावला आहे, डीनो मोरिया हा मातोश्रीची सून आहे, डीनो मोरिया हा आदित्य ठाकरेंचा बेटर हाफ आहे, असं नितेश राणे यांनी म्हटलं आहे.नेमकं काय म्हणाले नितेश राणे? डीनो मोरिया हा मातोश्रीची सून आहे, डीनो मोरिया अदित्य ठाकरेंचा बेटर हाफ आहे. आदित्य ठाकरे मंत्री असताना डीनो मोरिया वारंवार घरी जायचे, मुंबईतील सर्व गोष्टीला जबाबदार आदित्य ठाकरेंच्या नाईट लाईफचे मित्र आहेत. डीनो मोरिया ही मातोश्रीची सून आहे, त्यांचे मातोश्रीशी थेट संबध आहेत. अडीच वर्षांपूर्वी कोणाचं सरकार होतं? आदित्य ठाकरे यांनी माझ्यासोबत खुल्या व्यासपीठावर येऊन चर्चा करावी, डीनो मोरियासोबत अय्याशी केली नसती तर मुंबई बुडाली नसती, यांनीच नाईट लाईल गँगला कंत्राटं दिली, त्यामुळे ही अवस्था झाली,

# मान्सून स्थिर होईपर्यंत शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करु नये : जिल्हाधिकारी

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : यावर्षी मराठवाड्यात आणि नांदेड जिल्ह्यात मान्सूनपूर्व पाऊस खूप मोठया प्रमाणात आलेला आहे. हा पाऊस पुढच्या काही दिवसात स्थिर राहणार असला तरी हा अनियमित आणि अस्थिर स्वरुपाचा पाऊस आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करु नये, असे आवाहन जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांनी शेतकरी बांधवांना केले आहे.शेतकऱ्यांनी मान्सून स्थिर झाल्यावरच कृषी विभागाच्या सल्ल्यानुसारच पेरणी करावी. पेरणीची घाई करु नये. आता पेरणी केल्यास पीकावर किड रोगाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. तसेच मान्सून स्थिर होण्यापूर्वी पेरणी केल्यास दुबार पेरणीची शक्यता नाकारता येत नाही. आताच्या परिस्थितीत शेतकऱ्यांनी मशागतीची कामे करावीत व मान्सून स्थिर होण्याची वाट पाहावी, असेही आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.



# राज्यासह देशात नावलौकिक मिळवतील असे विद्यार्थी घडावेत :- माजी आ. भीमराव धोंडे

# भविष्यात सुखाच्या दिवसांसाठी विद्यार्थ्यांनी भरपूर कष्ट करावेत :- माजी आ. भीमराव धोंडे

# वॉटरप्रुफ मंडप असल्याने भर पावसात कार्यक्रम सुरू

कडा (प्रतिनिधी)दिवसेंदिवस आपल्या शाळांची गुणवत्ता वाढत चालली आहे. विद्यार्थ्यांनी आतापासून पुढच्या शिक्षणाची चांगली तयारी करावी आपल्याला काय व्हायचे ते आत्ताच ठरवावे. खेळाकडे लक्ष द्यावे. खेळामुळे देखील नोकरीत भरपुर संधी आहेत. सकाळी उठून अभ्यास करावा तसेच व्यायाम करावा. जिवनात सुखाचे दिवस पाहण्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगले कष्ट करावे, मन लावुन अभ्यास करावा. भावी जीवनात चांगले काम करावे. शिक्षकांनी राज्यासह देशात नावलौकिक मिळवतील असे विद्यार्थी घडावेत, गुणवत्ता व निकाल वाढविण्यासाठी प्रयत्न करावा असे प्रतिपादन संस्थाअध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे यांनी कडा येथे केले. आनंदराव धोंडे महाविद्यालयाच्या प्रांगणात कार्यक्रमासाठी वॉटरप्रुफ मंडप उभारण्यात आला होता त्यामुळे मंगळवारी दिवसभर पाऊस सुरू असुन देखील भर पावसात गुणवंत सत्कार सोहळा उत्साहात संपन्न झाला.

शेतकरी शिक्षण संस्था, आनंद चॅरिटेबल संस्था, छत्रपती शाहु एज्युकेशन सोसायटी व किसान शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दहावी व बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ व कडा येथील आनंदराव धोंडे महाविद्यालयाचे प्रा. डॉ . महेमुद पटेल आणि कार्यालयीन कर्मचारी दिगंबर बोडखे ( पत्रकार ) यांच्या सेवापुर्ती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी व्यासपीठावर युवा नेते अजयदादा धोंडे,अभयराजे धोंडे , सामाजिक कार्यकर्ते बाबुलाल भंडारी, शेतकरी शिक्षण शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन राजेश धोंडे, ह. भ. प. पांडुरंग महाराज कर्डीले, ग्रामपंचायत सदस्य बाळासाहेब देशमुख, डॉ. गोसावी, सरपंच चंदनशिव, सेवानिवृत्त सैनिक हांगे, उपसंपादक उत्तम बोडखे,प्राचार्य डॉ. बापुराव धोंडे,प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ, ठकाराम दुधावडे, दिव्यांग कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र लाड व इतर मान्यवर उपस्थित होते.

पुढे बोलताना माजी आमदार भीमराव धोंडे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी चांगली गुणवत्ता प्राप्त करुन जिवनात नावलौकिक करावे तसेच आई- वडील, आपले गाव आणि संस्थेचे नांव मोठे करावे. दहावी परिक्षेत शंभर टक्के गुण मिळविणारे अनेक विद्यार्थी आहेत. ते खरोखरच कौतुकास पात्र आहेत तसेच अनेक शाळांचा निकाल शंभर टक्के लागला आहे. ज्यांचे निकाल कमी आहेत अशा मुख्याध्यापकांनी पुढील वर्षी विद्यार्थ्यांकडून चांगला अभ्यास करून घ्यावा व आपणही शंभर टक्के निकाल लावुन गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करावा, गुणवंत विद्यार्थी कोठेही गेला तरी त्याने बौद्धिक दृष्टीने आपले नाव काढले पाहिजे. चांगल्या शैक्षणिक गुणवत्तेबद्दल आष्टी येथील पंडीत नेहरु विद्यालयाचे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी कौतुक केले. आपापल्या शाळेची गुणवत्ता वाढविल्यास विद्यार्थी



आपोआप वाढतील, पालक तुमच्याकडे प्रवेशासाठी चकरा मारतील. विद्यार्थ्यांसाठी संस्था अनेक उपक्रम राबविते. लवकरच कडा किंवा आष्टी येथे साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात येणार आहे. आष्टी विधानसभा मतदारसंघातील जनतेने मला कमी वयात पहिल्यांदा विधानसभेत पाठविले होते त्यामुळे मी त्यांच्या पाल्यांच्या वेगवेगळ्या प्रकारच्या शिक्षणासाठी शेवटपर्यंत काम करीत राहणार आहे . शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शेतकरी शिक्षण संस्था सुरू केली आहे. विद्यार्थ्यांनी मार्क कमी पडले तरी नाराज होऊ नका पुन्हा जिद्दीने अभ्यासाला लागा आणि पुढील परिक्षेत चांगले गुण मिळवून जिवनात यशस्वी व्हा. भविष्यात काय बनायचे ते आताच ठरवा, कष्ट करणाऱ्याला यश मिळते. विद्यार्थ्यांनी वर्षे भर आणि परिक्षा काळात वेळापत्रकानुसार अभ्यास कसा करावा,दिवस किती शिल्लक राहिले आहेत. विषय नियोजन कसे करावे याची सविस्तर माहिती माजी आमदार भीमराव धोंडे सांगितली. आजच्या गुणवंतांनी पुढील पाच सहा वर्षांनी मी असा अधिकारी बनलो आहे किंवा या क्षेत्रात कार्यरत आहे हे पेढे वाटून आम्हाला सांगावे म्हणजे आम्हालाही खरोखरच आनंद होईल, यावेळी माजी आमदार भीमराव धोंडे यांच्या हस्ते सेवानिवृत्ती बद्दल प्रा. डॉ. महेमुद पटेल व दिगंबर बोडखे ( पत्रकार ) यांचा सत्कार करण्यात आला.

प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, महाविद्यालयात सर्व प्रकारच्या शिक्षण सुविधा उपलब्ध आहेत. करिअर कट्टा, विविध ठिकाणी सेवेत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाचे केंद्र, विद्यापीठाचे पेपर तपासणी केंद्र. ४० वर्षांपुर्वी तालुक्यात मोजक्या शाळा होत्या. परंतु मा. आमदार भीमराव धोंडे यांनी पहिल्यांदा विधानसभा सदस्य झाल्यानंतर मतदारसंघातील अनेक गावांमध्ये शाळा, कनिष्ठ महाविद्यालये, वरिष्ठ महाविद्यालये सुरु करुन शिक्षणाची सोय केलेली आहे. आनंदराव धोंडे महाविद्यालयात आजचा २७ वा सत्कार समारंभ आहे. यावेळी प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे व इतरांची उपस्थिती होती. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ . एस. एन. वाघुले,उपप्राचार्य डॉ. भास्कर चव्हाण, उपप्राचार्य डॉ.बापु खैरे, प्रा. डॉ. सज्जन गायकवाड, , प्रा. डॉ. महेमुद पटेल, प्रा. मंडलीक व इतरांची भाषणे झाली. संस्थेमधून प्रथम, व्दितीय व तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे १० हजार, ७ हजार व ४ हजार रुपयांचे रोख बक्षीस देऊन संस्था अध्यक्ष माजी आमदार भीमराव धोंडे, अजयदादा धोंडे, अभयराजे धोंडे यांच्या हस्ते गौरविण्यात आले. यावेळी गुणवंत विद्यार्थी, पालक, शिक्षक, मुख्याध्यापक व कडा येथील ग्रामस्थ उपस्थित होते. सुत्रसंचलन प्रा. शैलजा कुचेकर यांनी केले.उपस्थितांचे आभार उपप्राचार्य डॉ. संभू वाघुले यांनी मानले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादकः राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २८ मे २०२५
https://lokaarambh.com



## संपादकीय

### अस्वस्थ दिवसांची डायरी

उद्या मंत्रिमंडळाचा विस्तार आहे. काय होईल? नागपूरचे तिकीट काढावे की काढू नये? अजून तरी मला फोन आलेला नाही. आता एवढी वर्षे राजकारणात घालवल्यावर माझा राजकीय हवामानाचा अंदाज सहसा चुकत नाही. द्राक्ष पाहिल्याक्षणी ते आंबट आहे की गोड आहे याचा अंदाज यावा, एवढी माझी नजर आता तयार झालेली आहे. एकूण, यावेळी द्राक्ष आंबट दिसतात. इतरांच्या शपथविधीला जाऊन टाळ्या वाजवण्यात काय अर्थ आहे? ही दाढी काही उन्हात पांढरी झालेली नाही, तुरुंगात झालेली आहे. आपण ङ्गफुलेफ वेचावी आणि हार मात्र इतरांच्या गळ्यांत पडावेत हे बरोबर नाही. ङ्गप्रकृती बरी नाहीफ असं सांगून आणि मफलर गु डाळून आरामखुर्चीत शांत बसून राहू, असं कितीही ठरवलं तरी ते दृश्य डोळ्यांसमोर पुनःपुन्हा येतं. ङ्गमीफ असा आवाज कानी पडताच पुढच्या रिकाम्या जागेत आपलं नाव गोवायचं, गोपनीयतेची शपथ घ्यायची आणि पुष्पगुच्छ स्वीकारायचा. तीच खरी ङ्गफुलेफ, बाकी सगळी उगीच नावापुरती. पण यावेळी फुले मिळण्याऐवजी फुली मारली जाणार असं दिसतं. आज रात्री झोप लागणं अवघडच आहे. अखेर तेच झालं. ङ्गमी मंत्रिमंडळात नाहीफ हे वाक्य ऐकायला, वाचायला आणि पचायलाही जड जात आहे. किशोर कुमारचं गाणं सारखं आठवतंय. ङ्गदुखी मन मेरे. सुन मेरा कहना, जहां नही चैना, वहां नही रहना..फ साहेबांसोबतच राहायला हवं होतं का? यांच्यासोबत आलो ही आपली चूक झाली का? पण साहेबांचं तरी कुठं बरं चाललंय? आला गेला प्रत्येक कार्यकर्ता विचारतोय, ङ्गसाहेब, असं कसं हो झालं?फ खरंच मला कळत नाही, असं कसं आणि का झालं? माझ्या मनाचा चैना हरवला आहे, त्यावर मंत्रिमंडळात स्थान मिळणं हेच एकमेव औषध आहे. आमचे तात्यासाहेबांनी असे हवेत दोन हात पसरून विचारलं असतं, ङ्गकुणी औषध देता का औषध?फ काय करावं? पक्षाच्या मेळाव्याला जावं की जाऊ नये? कुठला पक्ष? या पक्षाला ङ्गआपला पक्षफ म्हणायला जीभ रेटत नाही. काल मुनगंटीवार भेटले, तेही असंच म्हणाले. काल पहिल्यांदाच त्यांनी एवढ्या प्रेमानं मिठी मारली. ङ्गघायल की गती घायल जाने...फ ते मला म्हणाले, ङ्गशांतपणे वाट पाहावीफ पण ते काही शांत दिसत नव्हते. पक्षाच्या अधिवेशनाला गेलो की पुन्हा हसनभाई भेटणार, धनंजय मु डे समोर येणार, त्यांचे प्रफुल्लीत चेहरे पाहून पोटात ढवळणार. त्यापेक्षा आपण जायलाच नको. पेपरवाले उद्या छापणार, ङ्गभुजबळ नागपुरात असून पक्षाच्या बैठकीला नाही आले.फ आपला समावेश झाला नाही त्याची चर्चा झाली, आपण पक्षाच्या मेळाव्याला गेलो नाही तर त्याचीही चर्चा होणार आहे. याची दखल दादा घेतील का? पण घेतली तरी आता काय उपयोग? एखाद्याची समजूत काढणं वगैरे त्यांच्या स्वभावात नाही. साहेब प्रेमानं बोलायचे, अगदी घात करताना सुद्धा त्यांच्या आवाजातला गोडवा कधी कमी झाला नाही. आपण सोडावा का पक्ष? मनात सारखा हाच विचार येतो आहे. जहां नही चैना, वहीं नही रहना, असं आपण म्हणालो होतो तेव्हा असाच अर्थ काढला गेला होता. ३३ वर्षांपूर्वी आपण पक्ष सोडला, तेव्हा सुरेश भटांना सुद्धा आपल्यावर दोन ओळी लिहाव्याशा वाटल्या होत्या. आता पक्ष सोडणं म्हणजे, या गोठ्यातली म्हैस त्या गोठ्यात बांधल्यासारखं सहज झालेलं आहे. त्यामुळे पक्ष सोडून फार काही साध्य होईल असं वाटत नाही. बरं, जाणार तरी कुठं? भाजपमध्ये गेलो तर ङ्गघरचं झालं थोडं आणि व्याह्यानं धाडलं घोडंफ अशी अवस्था आहे. शिंदेंकडे गेलो तर आपल्या जिल्ह्यातच तु बळ युद्ध सुरू होईल. ३३ वर्षांपूर्वी जी वाट सोडली ती पुन्हा धरण्यात काही अर्थ नाही. जावं का परत आपल्या साहेबांकडे? ते सुबहका भुला वगैरे काहीतरी म्हणतात ना, तसं? पण उद्या साहेबच पुन्हा दादांकडे परत आले तर काय करायचं? वाटीतलं ताटात आणि ताटातलं वाटीत असा प्रकार आहे सगळा. एकच एक प्रश्न छळतो आहे, आपण मंत्रिमंडळात का नाही? का नाही आपण मंत्रिमंडळात? मंत्रिमंडळात आपण का नाही? का आपण मंत्रिमंडळात नाही? प्रश्न कुठूनही सुरू केला तरी दुःखाची धार कमी होत नाही. दमानिया बाईंनी आयुष्यात एकच बरे काम केले असेल. कसला पिच्छा पुरवला बाईनं बीडच्या प्रकरणाचा, भले शाब्बास. पडलीच विकेट धनंजयची. पण आपण आता काही बोलू नये, जागा रिकामी झाली आहेच, आपल्याशिवाय आहेच कोण आता? अर्थात हे आपलं म्हणणं आहे. द्राक्ष कधी पडेल तोंडात, त्याची वाट पाहावी, ङ्गआफ करून बसावं, झालं! अरे, घराचे सगळे पडदे उघडा, केवढा अंधार करून ठेवलाय घरातफ असं मी आज म्हणालो तेव्हा सगळे कसे चकीत होऊन पाहात होते.

# ती आणि तिचा एकांत

दिवसभर सर्वांशी हसत खेळत असणारी रात्रीच्या काळोखात मात्र आपल्या भावनांचा पसारा स्वतासमोर मांडून स्वतःशीच हितगुज करायची. तिच्या अंतर्मनातील भावनेची लाट अशी उसळायची तिचं तिलाच कळत नसे की, ही लाट तिच्या वेदनांची की तिच्या आसवांची......कधी खूप हंबरडा फोडून रडायची तर कधी स्वतःच्याच मनाला आवर घालायची.पण तिची आर्त हाक कुणालाही ऐकू येत नसे......आयुष्याचं एक एक पान चाळतांना तिच्या जीवनाचा प्रत्येक पान तिला कोराचं दिसायचा.

तिला जीवनात खूप मोठं व्हायचं होतं तिने तिच्या पुढील भविष्यासाठी सुंदर स्वप्न बघितले होते. एक छोटिशी नोकरी असावी, एक समजदार व समजून घेणारा जोडीदार असावा,सुंदर छोटंसं घर असावं संसारवेलीवर दोन नाजूक कळ्या, फुलं उमलावे,घर अंगण विश्वासाच्या अत्तराने दरवळत रहावा हिच तिची अपेक्षा होती.पण म्हणतात न स्वप्न ते स्वप्नंच असत कधीच सत्यात उतरत नसतं. तिला माहीत नव्हते की, ती जे स्वप्न उघड्या डोळ्याने बघते त्याचा आनंद काही दिवसांचाच असेल.

वेळ आणि हालाकीच्या परिस्थितीमुळे ती तिचे शिक्षण पुर्ण करू शकली नाही आणि डोक्यात सतत ताणतणाव यामुळे अभ्यासात देखील तिचे मन लागले नाही. काही काळ उलटून गेला लग्न झाले मुले झालीत सुरुवातीला सर्व काही व्यवस्थित सुरू होते पण नंतर सासरचा जाच, सासुरवाडीतली तिला वाईट वागणूक आणि नवऱ्यात झालेला बदल या सर्व गोष्टी ती सहन करू शकत नव्हती. इतका असहनिय तिला त्रास व्हायचा की ती शब्दात व्यक्त करू शकत नव्हती आणि अश्यातच तिने स्वतःला संपवण्याचा प्रयत्न केला पण म्हणतात न देव तारी त्याला कोण मारी ती त्या मरणाच्या तोंडातून परत आली पण तिच्यावर झालेला अत्याचार तिला आठवत राहिला आणि एक दिवस ती त्यांच्यापासून वेगळी झाली पण कुठेतरी तिच्या दुखलेल्या मनाची ही हाय असावी की तिच्यावर अत्याचार करणारी तिची सासुरवाडीतले लोकं आजही सुखी नाहीत पण तिला झालेला त्रास ती कधी विसरली नाही.

तिने स्वतःला सावरण्याचा खूप प्रयन्त केला आणि आज स्वतःला सावरले जरी असेल तरी तिचे भविष्यात काय स्वप्न होते जे तिला साकार करायचे होते ते स्वप्न मात्र तुटले आणि जीवन जगायला असून सुद्धा एकलकोंडी आयुष्य जगतांना ती दिसते.

स्वतःला रमवण्यासाठी ती आपले मनातील भाव आसवे भरल्या डोळ्याने कागदावर रेखाटते जे जे तिला सुचते ते ते ती लिहिते रात्रीच्या एकांतात हुंदका देऊन रडते आणि स्वतःला विचारते कोणता गुन्हा केला होता मी?? ज्याची शिक्षा मला मिळत आहे. दिवसभर मित्रपरिवार हसत खेळत असली तरी तिच्या हसण्यामागचे दुःख कुणी समजून घेत नाही. तिला खरं तर अश्या आधाराची गरज होती जे तिच्या मनातील दुःख समजून तिला जीवन जगण्याला प्रेरित करतील तिची हिंमत बनतील पण जेव्हा तिला वाटतं तिला समजणारे कुणी नाही तेंव्हा ती हताश होते अन परत त्या एकांताला जवळ घेऊन स्वतःशी संवाद साधते.......

**जयश्री चव्हाण/जयु,पुलगाव वर्धा**

# सामान्यतेचा असामान्य सूर आणि समाजसेवेचा अखंड ध्यास

**डॉ.सोहेल चांद शेख या एका अशा व्यक्तीचा वाढदिवस साजरा करताना प्रत्येकाच्या मनात अभिमान आणि आनंद दाटून येतो, ज्याने कोरबू गल्लीसारख्या मागास भागात जन्म घेऊनही आपल्या कष्ट, मेहनत आणि जिद्दीच्या जोरावर स्वप्नांना पंख लावले. डॉ. शेख सोहेल चांद, एक नाव जे आज गेवराई शहरात आदर, प्रेम आणि विश्वासाचं प्रतीक बनलं आहे. सामान्य कुटुंबात जन्मलेल्या या तरुणाने आपल्या आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी रात्रंदिवस अभ्यासाचा कठीण मार्ग निवडला आणि स्वामी रामानंद तीर्थ मेडिकल कॉलेजमधून एमबीबीएस होत डॉक्टर बनण्याचा इतिहास घडवला. त्यांचा हा प्रवास म्हणजे प्रत्येक तरुणासाठी प्रेरणेचा झरा आहे, ज्याने खडतर परिस्थितीवर मात करत यशाची शिखरे गाठली. डॉ. सोहेल यांनी शिक्षण पूर्ण केल्यानंतर विविध ठिकाणी वैद्यकीय सेवा देत अनुभव कमावला, पण त्यांच्या मनात नेहमीच एक ओढ होती, ती म्हणजे आपल्या मूळ गावाला, आपल्या समाजाला परत देण्याची. म्हणूनच त्यांनी कोरबू गल्लीतच गेवराई हॉस्पिटल उभारलं आणि तिथे अखंड सेवा देण्यास सुरुवात केली. मोफत आरोग्य तपासणी असो किंवा मुस्लिम समाजासाठी अत्यंत महत्त्वाच्या खतना कॅम्पसारख्या सामाजिक उपक्रम असोत, डॉ. सोहेल नेहमीच पुढे असतात. त्यांचा हसतमुख स्वभाव, तोंडात साखर ठेवल्यासारखं बोलणं आणि प्रत्येकाशी आपुलकीने विचारपूस करणं, यामुळे ते अल्पावधीतच शहराच्या मनात घर करून गेले. ते कधीच आपल्या डॉक्टरकीचा गर्व करत नाहीत, उलट साधेपणाने, हसत-खेळत प्रत्येकाशी जोडले जातात. त्यांच्या या दिलदारपणामुळे आणि समाजसेवेच्या व्रतामुळे त्यांनी सर्वांचं मन जिंकलं. विशेष म्हणजे, त्यांच्या सोबत त्यांच्या पत्नी, ज्या स्वतः स्त्रीरोगतज्ज्ञ आहेत, त्या देखील गेवराई हॉस्पिटलमध्ये सेवा देतात, ज्यामुळे हे दांपत्य समाजसेवेचं एक आदर्श उदाहरण बनलं आहे. डॉ. सोहेल यांचा वाढदिवस हा केवळ उत्सव नाही, तर त्यांच्या कर्तृत्वाचा, समाजाप्रती असलेल्या निष्ठेचा आणि प्रेरणादायी प्रवासाचा सन्मान आहे. यानिमित्ताने त्यांना उदंड आयुष्य, उत्तम आरोग्य आणि समाजसेवेच्या कार्यात अखंड यश मिळो, हीच मनापासून शुभेच्छा!**

# पत्रकार संरक्षण कायद्या अंतर्गत आ.बाबुराव कदम कोहळीकर याच्यावर गुन्हा दाखल करा

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट किनवट : हदगाव येथील पत्रकार संघाचे तालुका अध्यक्ष तथा देशोन्नत्ती तालुका प्रतिनिधी संजय सूर्यवंशी यांना आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिल्या प्रकरणी किनवट तालुका मराठी पत्रकार परिषदेची जेष्ठ पत्रकार के.मुर्ती यांच्या आध्यक्षतेखाली किनवट येथे बैठक घेउन लोकप्रतीनिधी म्हणुवून घेणारे आ.बाबुराव कदम कोहळीकर यांचा निषेध करुन सहाय्यक



जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले आहे. हदगाव तालुका मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष तथा दैनिक देशोन्नतीचे पत्रकार संजय सूर्यवंशी यांना हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार बाबुराव कदम कोहळीकर यांनी अश्लील भाषेत शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी दिली आहे. पत्रकार संजय सूर्यवंशी व त्यांचा परिवार आ. बाबुराव कदम यांच्या धमकीने घाबरून गेला आहे. दहशतीत आपले जीवन जगत आहेत. आमदार बाबूराव कदम कोहळीकर यांच्या कार्यकर्त्यांकडून त्यांना धोका निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या प्रकरणी त्यांच्या विरोधात पत्रकार संरक्षण कायदांतर्गत गुन्हा दाखल करावा व पत्रकार संजय सूर्यवंशी यांना संरक्षण देण्यात यावे आशी मागणी करून उपवीभागीय कार्यालयात सहाय्यक जिल्हाधिकारी यांना निवेदन दिले नायब तहसीलदार मुंडे यांनी निवेदन स्वीकारले. या निवेदनावर किनवट तालुका मराठी पत्रकार परिषदेचे के.मुर्ती,फुलाजी गरड पाटील प्रदीप वाकोडीकर तालुकाध्यक्ष प्रमोद पोहरकर सचिव बालाजी सिरसाट कार्याध्यक्ष किरण ठाकरे, मा.अध्यक्ष दुर्गादास राठोड, उपाध्यक्ष गौतम येरेकार कोषाध्यक्ष बबन वानखेडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कॅप्टन जितेश शर्माची मॅचविनिंग खेळी, आरसीबीची टॉप २ मध्ये एन्ट्री, लखनौचा ६ विकेट्सने धुव्वा

कर्णधार जितेश शर्मा, मयंक अग्रवाल आणि विराट कोहली या त्रिकुटाने केलेल्या चाबूक खेळीच्या जोरावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुने आयपीएलच्या 18 व्या मोसमातील शेवटच्या सामन्यात लखनौ सुपर जायंट्सवर 6 विकेट्सने विजय मिळवला आहे. आरसीबीने या विजयासह इतिहास घडवला आहे. आरसीबीने आयपीएल इतिहासात तिसऱ्या सर्वोच्च धावसंख्येचा यशस्वी पाठलाग केला. लखनौने आरसीबीसमोर 228 धावांचं आव्हान ठेवलं होतं. आरसीबीने हे आव्हान 18.4 ओव्हरमध्ये 4 विकेट्स गमावून पूर्ण केलं. आरसीबीचा हा या मोसमातील एकूण नववा तर घराबाहेरील सातवा विजय ठरला. आरसीबीने या विजयासह टॉप 2 मध्ये धडक दिली आहे. तसेच आरसीबीची 2011, 2016 नंतर थेट क्वालिफायर 1 मध्ये पोहचण्याची तिसरी वेळ ठरली आहे. तर दुसऱ्या बाजूला लखनौला 227 रन्स करुनही पराभवाचा सामना करावा लागला आहे. कर्णधार ऋषभ पंत याने केलेल्या 118 धावांच्या शतकी खेळीच्या जोरावर लखनौने आरसीबीविरुद्ध 227 रन्स केल्या. प्रत्युत्तरात आरसीबीच्या फिलिप सॉल्ट आणि विराट कोहली या जोडीने अप्रतिम सुरुवात केली. या दोघांनी 61 धावा जोडल्या. फिलिप आऊट झाल्याने ही जोडी फुटली. फिलीने 30 रन्स केल्या. त्यानंतर विलियम ओरुर्क याने आठव्या ओव्हरमधील शेवटच्या 2 चेंडूंवर आरसीबीला सलग 2 झटके दिले. रजत पाटीदार 14 धावांवर आऊट झाला. तर विलियमने लियाम लिविंगस्टोन याला पहिल्याच बॉलवर एलबीडब्ल्यू करत मैदानाबाहेरचा रस्ता दाखवला. त्यामुळे आरसीबीची 3 आऊट 90 अशी स्थिती झाली. त्यानंतर विराट आणि मंयक अग्रवाल या जोडीने काही वेळ आरसीबीचा डाव सावरला. मात्र फार वेळ हे शक्य ठरलं नाही. चौथ्या विकेटसाठी मयंक आणि विराटला 33 रन्सच जोडता आल्या. आवेश खान याने आरसीबीला मोठा झटका दिला. आवेशने विराटला आयुष बदोनी याच्या हाती कॅच आऊट केलं. विराटने 30 बॉलमध्ये 10 फोरसह 54 रन्स केल्या. त्यानंतर मयंक आणि जितेश शर्मा या जोडीने आरसीबीला विजयी करण्याची जबाबदारी आपल्या खांद्यावर घेतली. दोघांनी ही जबाबदारी सार्थपणे पारही पाडली. या दोघांनी पाचव्या विकेटसाठी 107 रन्सची नॉट आऊट पार्टनरशीप केली. या दरम्यान दिग्वेश राठी याने ही जोडी फोडण्यासाठी मंकडिंग करण्याचा प्रयत्न केला. मात्र त्यात त्याला यश आलं नाही. तसेच लखनौला विकेटही मिळाली होती. मात्र नेमका तोच नो बॉल होता. त्यामुळे एकंदरीत आरसीबीसोबत नशिबाचीही साथ मिळाली. आरसीबीची ऐतिहासिक विजय मयंक अग्रवाल याने 23 बॉलमध्ये 5 फोरसह नॉट आऊट 41 रन्स केल्या. तर जितेश शर्मा याने त्याच्या आयपीएल कारकीर्दीतील सर्वोच्च धावसंख्या



केली. जितेशने 33 बॉलमध्ये 6 सिक्स आणि 8 फोरसह नॉट आऊट 85 रन्स केल्या. जितेशचं हे पहिलंवहिलं अर्धशतक ठरलं. लखनौकडून विलियम ओ रुर्क याने 2 विकेट्स मिळवल्या. तर आकाश महाराज सिंह आणि आवेश खान या दोघांनी प्रत्येकी 1-1 विकेट मिळवली.

## मा. प्रितीताई भुजाडे यांची नागपूर जिल्हा महिला अध्यक्षपदी नियुक्ती



प्रतिनिधी भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ (भारत) यांच्या नागपूर जिल्हा महिला अध्यक्षपदी मा. प्रितीताई भुजाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. सामाजिक भान, कार्यतत्परता आणि नेतृत्वगुणांच्या आधारे त्यांची ही निवड करण्यात आली असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली नागपूर जिल्ह्यातील महिला सक्षमीकरणाला एक नवी दिशा लाभेल, असा विश्वास महासंघाच्या पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. या नियुक्तीबद्दल मा. प्रितीताई भुजाडे यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले असून, पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या आहेत. या प्रसंगी डॉ. संजय कांबळे, राष्ट्रीय अध्यक्ष, भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ (भारत) आणि मा. दिपाली पवार, राज्य महिला संघटक, भारतीय स्वयंसेवी संस्था महासंघ (भारत) यांनी विशेष शुभेच्छा दिल्या. त्यांनी म्हटले की, "मा. प्रितीताई भुजाडे यांच्या सशक्त नेतृत्वाखाली नागपूर जिल्ह्यात महिलांना अधिकाधिक प्रोत्साहन मिळेल."

## मनवर कुटुंबीयांच्या स्वागत समारंभात गटशिक्षणाधिकारी अनिल पवार यांची सदिच्छा



श्री. एल. टी. मनवर सर आणि सौ. सीमाताई मनवर (देवतळे) मॅडम यांच्या मुलाच्या स्वागत समारंभप्रसंगी गटशिक्षणाधिकारी अनिल पवार सर यांनी उपस्थित राहून कुटुंबीयांना सदिच्छा दिल्या. या विशेष प्रसंगी त्यांनी मनवर कुटुंबीयांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या व मुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. समारंभाचे आयोजन उत्साहात व सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडले. शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, स्थानिक शिक्षक, नातेवाईक आणि मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. गटशिक्षणाधिकारी अनिल पवार सर यांची उपस्थिती सर्वांसाठी विशेष आनंददायक ठरली.

## 75 वर्षात पहिल्यांदाच 26 मे रोजी मान्सून दाखल, 107 वर्षाचा विक्रम यावर्षी मोडला.



वाशिम : नैऋत्य मोसमी पावसाने अखेर २६ मे रोजी मुंबईत आपली ॲडव्हान्स इंट्री केल्याचे हवामान विभागाने जाहीर केले. मान्सूनच्या दमदार एन्ट्री मुळे सोमवारी दिवसभरात मुंबईकरांची झोप उडाली असे दिसून आले आहे. रस्ते,रेल्वे, आणि मेट्रो सेवेलाही या पावसाचा जबर फटका बसला आहे.

## वृद्धाला सर्पदंश

प्रतिनिधी ठकसेन गायकवाड
मानोरा: तालुक्यातील रुद्राळा खापरी येथील ६० वर्षीय व्यक्तीला सर्पदंश झाल्याची घटना २६ मे रोजी दुपारी ४:३० वाजता घडली.रामराव भीमराव खाडे असे सर्पदंश झालेल्या व्यक्तीचे नाव आहे.प्राप्त माहितीनुसार रुद्राळा खापरी येथील रामराव भीमराव खाडे राहत्या घरी असताना त्यांना सर्पदंश झाला घटना लक्षात येताच कुटुबियांनी त्यांना उपचारासाठी कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले सद्यपरिस्थितीत त्यांच्यावर उपचार सुरू असून प्रकृती स्थिर असल्याची माहिती आहे

## शहापुरात दुसरे कवी संमेलन व प्रातिनिधिक पुस्तक प्रकाशन सोहळा 2025

प्रतिनिधी प्रांजली काळबेंडे
शहापूर (27 मे )- माझी लेखणी साहित्य मंच आयोजित दुसरे कवी संमेलन व प्रातिनिधिक पुस्तक सोहळा शुभ मंगल कार्यालय आसनगाव येथे दि. 25 मे 2025 रोजी पार पडला. या कार्यक्रमाचे संमेलनाध्यक्ष कविवर्य प्रा. जगदीश संसारे, स्वागताध्यक्ष मा. रविंद्र गाडगीळ, प्रमुख अतिथी मा. विजया माणगावकर, विशेष अतिथी मा. शर्मिला पाटोळे तसेच माझी लेखणी मंचाचे संस्थापक अध्यक्ष मा. संदीप जगताप, कार्याध्यक्षा मा. रजनी अहेरराव, महिलाअध्यक्षा स्वप्ना बेलदार. तसेच प्रशासिका सुरेखा दुग्गे, धनश्री साबळे, संगिता पाटील, मानसी आंब्रे, राजश्री कामठे,स्मिता गजे उपस्थित होत्या. प्रातिनिधिक काव्यसंग्रहास प्रेरणादायी अशी प्रस्तावना मा.राज अहेरराव सरांनी दिली आहे. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून या संमेलनासाठी साहित्यिक उपस्थित होते. दोन सत्रात कार्यक्रम पार पाडण्यात आला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे प्रमोद पाटोळे यांनी खेळ पैठणीचा घेतला पैठणी विजेत्या साक्षी तायशेटे यांना मान्यवरांच्या हस्ते पैठणी देण्यात आली. रेडिओ जॉकी पुणे माधवी पवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा गायन केले,आशा नष्टे यांनी स्वागत गीत गायले तसेच लकी ड्रॉ दोन विजेत्यांना मा. विकास पाटील आणि मा. गीता शेलार यांना महान



ग्रंथ ज्ञानेश्वरी भेट म्हणून देण्यात आला. मा.स्वप्ना बेलदार (रजनी स्वप्न),मा.संदीप जगताप( प्रिये ), मा. रमेश भेरे ( रागिणी स्मृतिगंध), मा.दत्तात्रय इंगळे ( परीस स्पर्शाच्या पाचकथा) व मा.शारदा पाटील ( देवीला) यांच्या पुस्तकांचे प्रकाशन झाले. उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले,जगदीश संसारे सरांनी नवोदित साहित्यिकांना मोलाचे मार्गदर्शन केले. स्नेहभोजना नंतर दुसऱ्या सत्रास सुरुवात करण्यात आली यात काव्यसादरीकरण व साहित्यिकांचा सत्कार करण्यात आला. राजश्री मराठे यांनी प्रभावी सूत्रसंचालन केले. बालकवी अनिरुद्ध कुमावत, दक्षता थोरात आणि दर्शना थोरात यांचे मोलाचे सहकार्य लाभले .तसेच माझी लेखणी साहित्य समूहात ऑनलाईन झालेल्या स्पर्धेत विजयी झालेल्या स्पर्धकांना बक्षिस देऊन बक्षिस वितरण सोहळा पार पडला. पाणीपुरी आणि हळदी कुंकू, वाण( हळदी कुंकू पांचपाळ) देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## पंडित नेहरू यांनी आधुनिक भारताचा पाया रचला - प्राचार्य अप्पासाहेब नेमाने

प्रतिनिधी पाचोड
पाचोड दि. 27 : आदर्श नेता, धुरंधर राजकारणी आणि प्रतिभावान साहित्यिक असलेले स्वतंत्र भारताचे शिल्पकार पहिले पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी आधुनिक भारताचा सर्वांगीण विकासाचा पाया रचला, त्याचबरोबर स्वतंत्र भारतात लोकशाही रुजविण्याचे कार्य केले असे प्रतिपादन प्राचार्य अप्पासाहेब नेमाने यांनी केले. पाचोड येथील शिवछत्रपती महाविद्यालयामध्ये भारताचे माजी पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांच्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी प्रमुख मार्गदर्शक व प्रमुख पाहुणे म्हणुन बीसीए महाविद्यालयाचे प्राचार्य अप्पासाहेब



नेमाने बोलत होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे हे होते. प्रारंभी पंडीत जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेला मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरू यांनी भारताच्या विकासासाठी शिक्षण, उद्योग आणि विज्ञान, कृषी या क्षेत्राच्या विकासासाठी अनेक योजना सुरू केल्या. त्यांनी भारताला एक मजबूत आणि स्वतंत्र राष्ट्र म्हणून जागतिक स्तरावर स्थापित केले असे मनोगत प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी व्यक्त केले. प्राचार्य डॉ. कोठावळे अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ज्ञानेश्वर बेटुळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. दीपक कोकरे यांनी केले. उपस्थितांचे आभार श्री. श्रीकांत चिंचखेडे यांनी व्यक्त केले. यावेळी डॉ. विठ्ठल देखणे, प्रा. ज्ञानेश्वर बेटुळे, सर्वश्री वैभव राऊत, श्रीकांत चिंचखेडे, प्रतिक देशमुख, मुरलीधर झिने, विलास झिंने आदी उपस्थित होते.

## पत्रिकेचा ट्रेंड बदलला, डिजिटल ला पसंती !

प्रतिनिधी सौरभ आडे
वाशिम: पूर्वी लग्नाची निमंत्रण हे नातेवाईकांच्या घरी प्रत्यक्ष भेट देत दारात अक्षता ठेवून दिले जायचे बदलत्या काळात याची जागा छापील लग्न पत्रिका घेतली आता तरी लग्नपत्रिका ही ऑनलाईन झाल्याने कागदी लग्नपत्रिकांचा ट्रेंड मागे पडत असल्याचे चित्र आहे अलीकडच्या काळात तंत्रज्ञानाने झपाट्याने प्रगती केली यामुळे प्रत्येक क्षेत्रात अमुलाग्र बदल झाला आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात निमंत्रणही ऑनलाईन झाले आहे पूर्वीच्या काळी नातेवाईकांच्या घरी जाऊन निमंत्रण दिले जात होते त्यानंतर साध्या पद्धतीच्या पत्रिका छापून घरपोच घेऊन जायची या निमंत्रण नातेवाईक सन्मानाची निमंत्रण समजत होते त्यामुळे पूर्ण कुटुंब त्या कार्यात सहभागी होत असे वेडिंग मार्केट झपाट्याने विस्तारं नसताना ऑनलाईन निमंत्रण देण्याला चांगलेच महत्त्व आले आहे सोशल साइटवर डिजिटल लग्न पत्रिका टाकण्याकडेही कल वाढला आहे विशेष म्हणजे लिखित पत्रिकेची थेट दृकश्राव्य स्वरूपातील निमंत्रण दिले जात आहे मोबाईल क्रांतीचा फायदा पूर्वी घरोघर आणि गावोगावी जाऊन लग्नपत्रिका वितरित करावी लागत असेल




लग्नाचे दिवस जसे जवळ आले त्यात कोणाकडे निमंत्रण पत्रिका पोहोचली नाही याची चिंता आता मोबाईल क्रांतीमुळे मिटली शिवाय ऑनलाइन पत्रिका विविध प्रकार आल्याने पाहिजे तशा पद्धतीत बदल करता येतात बदल स्वीकारत असल्याचे लग्न पत्रिकेचा अट्टहास कमी झाला आहे खर्चात झाली बदल सोशल मीडियावर ही पत्रिका पाठवून फोन करून कळविली जाते त्यामुळे शेकडोद छापण्यात येणाऱ्या लग्न पत्रिका आता केवळ ५०-१०० छापल्या जात असल्याने आताही प्रथम मागे पडू लागली आहे "माझ्या लग्नाला यासोशल मीडियावर आमंत्रण देण्यामुळे प्रचंड वेळ वाचला आणि सर्वांनी हजेरी लावली खर्चही कमी प्रमाणात झाला यास नातेवाईकासह मित्रमंडळींनी प्रचंड प्रतिसाद दिला"

## स्वर्गीय कोठुजी कुंभारे वसतीगृहाचे इचलकरंजीत उद्घाटन

इचलकरंजी(प्रतिनिधीगुरुनाथ तिरपणकर) मुंबईतील दानशूर समाज बांधव कै . कोठूजी कुंभारे यांच्या स्मृती चिरंतर ठेवण्याच्या उद्देशाने बांधलेल्या कै. कोठूजी कुंभारे वसतीगृहाचे उद्घाटन हम्पी येथील गायत्री पिठाचे अधिपती श्री श्री श्री दयानंद पुरी महास्वामीजी यांच्या शुभहस्ते, व महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळाचे अध्यक्ष प्रकाशराव सातपुते व मॅनेंजिंग ट्रस्टी अंकुशराव उकार्डे यांचे प्रमुख उपस्थित दिमाखदारपणे संपन्न झाले महाराष्ट्र कोष्टी समाज सेवा मंडळाने केलेल्या आर्थिक मदतीने व श्री देवांग समाज रजिस्टर इचलकरंजी यांनी या वसतिगृहाचे बांधकाम केले आहे . याप्रसंगी मार्गदर्शन करताना स्वामीजींनी




कोष्टी समाजाच्या उन्नतीसाठी शिक्षणाचा प्रसार, आर्थिक प्रगती व समाजाची एकता होणे गरजेचे आहे असे प्रतिपादन केले. प्रारंभी देवांग समाज अध्यक्ष श्री विश्वनाथ मुसळे व त्यांच्या पत्नी सौ विद्याताई यांच्या हस्ते त्यांची पाद्यपूजा करण्यात आली. स्वामीजींचा सत्कार महाराष्ट्र कोष्टी समाजसेवा मंडळ मुंबईचे अध्यक्ष श्री प्रकाशराव सातपुते व अंकुशराव उकार्डे यांचे हस्ते व कोष्टी फेडरेशनचे अध्यक्ष श्री अरुणराव वरोडे यांच्या उपस्थित संपन्न झाला. स्वागत व प्रास्ताविक देवांग समाजाचे अध्यक्ष श्री विश्वनाथ मुसळे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री पंडित ढवळे यांनी केले व शेवटी आभार प्रदर्शन श्री राजेंद्र सांगले यांनी केले. याप्रसंगी देवांग समाजाच्या चौंडेश्वरी गृहनिर्माण, महिला मंडळ, महिला पतसंस्था, युवा संघटना इत्यादी विविध संस्थांच्या वतीने स्वामीजींचा सत्कार करण्यात आला. या उद्घाटन प्रसंगी , निमंत्रित ट्रस्टी, श्री राजेंद्र ढवळे, उपाध्यक्ष उदयराव बुगड, सल्लागार विश्वनाथ मुसळे, श्री विठ्ठलराव डाके, महासचिव रामचंद्र निमणकर, सचिव मिलिंद कांबळे उदयराव बुगड , महिला कार्याध्यक्ष सौ स्मिता सातपुते, तसेच सौ स्मिता बगड,सौ संगीता धूत्रे ,श्रीमती प्रीती बुगड,सौ दीपा सातपुते, श्रीमती सुशीला फाटक ,सौ उज्वला कबाडे ,सौ.रूपा बुगड तसेच दिलीप भंडारे ,शितल सातपुते विलास पाडळे, डी,एम कस्तुरे ,राजेंद्र चांगले, प्रमोद मुसळे, कुमार कबाडे मधुकर वरुटे ,आनंदा साखरे, उत्तम म्हेत्रे, जयेश बुगड राहूल सातपुते दयानंद लिपारे महेश ढवळे इत्यादी मान्यवर तसेच समाज बंधू-भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# इंगोले परिवाराकडून मुलींच्या वसतिगृह व जिजाऊ सृष्टीसाठी एक लाखाची मदत वृक्ष लागवड करून सुतक फेडले

नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट नांदेड : भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे माजी संचालक रंगराव पाटील इंगोले यांचे गुरुवार दि.२२ मे रोजी दु:खद निधन झाले.रंगराव इंगोले यांच्या मृत्यू पश्चात राख व अस्थी गंगेत न टाकता स्वतःच्या शेतामध्ये टाकुन त्यावर झाडे लावली. अनावश्यक विधींचे कर्मकांड टाळले राख गंगेत न टाकता प्रदुषणही टाळले. राख व अस्थी स्वतःच्या अर्धापुर तालुक्यातील मालेगाव येथील शेतात टाकून त्यावर आठवण म्हणून वृक्षारोपण केले. सुतक तथा विटाळ तीन दिवसात फेडला त्याचबरोबर तेरवीचा अनावश्यक खर्च टाळुन प्रत्येकी एक लाख एक हजार एकशे अकरा रूपये ऐवढी मदत रक्कम सिंदखेडराजा येथे होत असलेल्या जिजाऊ सृष्टीसाठी व मराठा सेवा संघाच्या वतीने नांदेड शहरात चालत असलेल्या मुलिच्या वसतिगृहासाठी दिला. हा अंत्यविधी पूर्णतः अनिष्ट रूढी परंपरा यांना फाटा देत पार पडला. याआधीही रंगराव इंगोले यांचे वडील शंकरराव इंगोले यांच्या मृत्युनंतर रंगराव इंगोले यांनी मालेगाव येथील जिह्ला परिषद शाळेला एक खोली बांधुन दिली होती.शेतामध्येच रंगराव इंगोले यांचीप्रतिमा ठेवून पूजन करण्यात आले. यावेळी तुकाराम महाराज यांच्या अभंगाचे वाचन केले व जिजाऊ वंदनेने हे सुतक फेडले. यामुळे कर्मकांडावर होणारा अनावश्यक खर्च, कुटुंब व नातेवाईक यांचा वेळेचा होणारा अपव्यय, यामुळे कुटुंबाचे होणारे नुकसान इंगोले परिवारानी वाचवले. जगासमोर एक आदर्श पायंडा निर्माण करून दिला. मराठा सेवा संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष कामाजी पवार,मार्गदर्शक मधुकरराव देशमुख,राज्य सहसचिव डॉ पंजाबराव चव्हाण,मराठा सेवा संघाचे विभागीय अध्यक्ष इंजि.



शे.रा.पाटील, सोपानराव क्षिरसागर,पंडीत कदम, मराठा सेवा संघाचे जिह्लाध्यक्ष सतीश जाधव, मराठा सेवा संघाचे जिह्लाध्यक्ष पि.के.कदम,प्रा. वर्ताळे, गजानन इंगोले यांना सिंदखेडराजा येथील जिजाऊ सृष्टी व मराठा सेवा संघाच्या वतीने नांदेड शहरात चालत असलेल्या मुलिच्या वसतिगृहासाठी प्रत्येकी एक लाख अकरा हजार एकशे अकरा रपयाचा चेक देण्यात आला यावेळी सरस्वती शिक्षण संस्थेचे संचालक वसंत इंगोले, भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे संचालक बळवंत इंगोले, दिनेश इंगोले,ॲड.गोविंद इंगोले,प्रा.ज्ञानेश इंगोले,भास्कर इंगोले,माजी जि.प.सदस्य नागोराव इंगोले, प्रह्लाद इंगोले,अनिल इंगोले आदीसह अनेकांची उपस्थित होते. भारतीय समाजव्यवस्थेत माणसाच्या आयुष्यात जन्मापासून मृत्युपर्यंत अनेक नाहक कर्मकांड चिकटलेले आहे. त्यामुळेच देशाच्या प्रगतीला खीळ बसली आहे. अनेक लोकांना स्वातंत्र्याच्या 75 वर्षानंतरही हक्काचे घर नाही. परंतु शोषण करणारे कर्मकांड मात्र कायम चिकटलेले आहे. दशक्रिया विधी व तेरवी सारख्या विधींमुळे अनेक लोकांची घरे उद्ध्वस्त झाली आहेत. स्वतःला सावरत देशाला सावरण्यासाठी अशाच पुरोगामी विचारांची गरज आहे. हाच आदर्श विचार आणि वारसा इंगोले परिवाराने प्रत्यक्षात समाजासमोर ठेवला आहे.




दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
आंतरराष्ट्रीय



# संरक्षण मंत्रालयाची सर्वात मोठी घोषणा ! भारत स्वत: बनवणार फिफ्थ जनरेशनचं फायटर प्लेन

शस्त्रास्त्राच्या बाबतीत आत्मनिर्भर होण्याचा भारताकडून सातत्याने प्रयत्न केला जात आहे. पाकिस्तानसोबतच्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर भारताच्या स्वदेशी शक्तीला संपूर्ण जगाने पाहिलं आहे. आता भारताने स्वदेशी जेट बनवण्याची तयारी सुरू केली आहे. संरक्षण मंत्रालयाने फायटर प्लेनचे पहिले फोटो सोशल मीडियावर शेअर केले आहेत. याचं नाव उन्नत मध्यम लढाऊ विमान (Advanced Medium Combat Aircraft (AMCA) असं ठेवण्यात आलं आहे. पाचव्या जनरेशनचं हे प्लेन असेल. हा प्रकल्प पूर्ण करण्याची जबाबदारी DRDOकडे सोवण्यात आली आहे. DRDOने यापूर्वीही असे असंख्य स्वदेशी शस्त्र तयार केले होते. तसेच हे शस्त्र बनवण्यासाठी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मंजुरीही दिली आहे. याबाबत संरक्षण मंत्रालयाने माहिती दिली आहे. भारत स्वदेशी संरक्षण क्षमता वाढवण्यासाठी आणि देशांतर्गत मजबूत एअरोस्पेस औद्योगिक पारिस्थितिकी तंत्राला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने प्रयत्न सुरू केला आहे, असं संरक्षण मंत्रालयाने म्हटलं आहे. तर उन्नत मध्यम लढाऊ विमान कार्यक्रम निष्पादन मॉडलला संरक्षण मंत्री




राजनाथ सिंह यांनी मंजुरी दिली आहे. एअरोनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सी उद्योग भागिदारीच्या माध्यमातून कार्यक्रम क्रियान्वित करण्यासाठी तयार आहे. हे एएमसीए प्रोटोटाइप विकसित करण्यासाठी स्वदेशी विशेषज्ञता, क्षमता आणि सामर्थ्याचा उपयोग करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे. त्यामुळे एअरोस्पेस क्षेत्रात आत्मनिर्भरतेच्या दिशेने मैलाचा दगड ठरणार आहे. स्टिल्थ तंत्रज्ञानाचा समावेश एअरोनॉटिकल डेव्हलपमेंट एजन्सी ही डीआरडीओच्या अंतर्गत काम करते. आता या योजनेचं नेतृत्व करत आहे. एडीएने खासगी आणि सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांसोबत भागिदारीच्या माध्यमातून या योजनेला गती देण्याची योजना तयार केली आहे. हा सहयोगात्मक दृष्टीकोण केवळ नवनिर्मितीला प्रोत्साहन देणार नाही, तर स्वदेशी संरक्षण उद्योगात रोजगार सृजन आणि आर्थिक विकासालाही प्रोत्साहित करेल. एएमसीएच्या प्रोटोटाइपच्या विकासासाठी स्वदेशी तज्ज्ञ आणि उन्नत तंत्रज्ञानाचा उपयोग केला जाईल. यात स्टिल्थ तंत्रज्ञान, सुपरक्रूज क्षमता, उन्नत सेन्सर आणि शस्त्र प्रणाली असणार आहे. त्यामुळे देशाच्या शस्त्र सज्जतेला मोठा फायदा होणार आहे.

## न गोळीबार केला, न मिसाईल डागली, चीनला त्याच्या सर्वात छोट्या शत्रूनं मुळापासून हादरवलं

चीनच्या राक्षसी महत्वाकांक्षा आणि विस्तारवादाने जगाला टेन्शन आलेले आहे. दुसरी आर्थिक महासत्ता असलेल्या चीन सध्या दक्षिण आशियात भारताही डोकेदुखी ठरला आहे. अशात एका छोट्याशा देशाने चीनची हवा टाईट केलेली आहे. चीनी अधिकाऱ्यांनी दावा केला आहे की तैवानचा सत्ताधारी पक्ष DPP वर मोठा सनसनाटी आरोप केला आहे.चीनने त्यांच्या गुआंगझोउ शहरावर सायबर हल्ला केल्याचा आरोप तैवानच्या सत्ताधारी पक्ष DPP वर केला आहे.

चीनने पाकिस्तानला सढळ हस्ते 4.5 पिढीचे फायटर जेट दिले आहे. सध्या चीन आणि पाकिस्तान यांच्याकडेच 4.5 व्या पिढीचे फायटर जेट आहे. त्यामुळे चीनने पाक, बांगलादेश आणि अफगाणिस्तान यांनाही कर्ज देण्याच्या बदल्यात आपले उखळ पांढरे करुन घेतले आहे. त्यातच आता चीनला एका छोट्याशा देशाने त्रास दिला आहे.

पोलिसांनी केलेल्या प्राथमिक तपासात या हल्ल्यामागे परदेशी हँकर्स संघटनेला तैवानची डेमोक्रेटिव्ह प्रोग्रेसिव्ह पार्टीचे ( DPP ) समर्थन असल्याचा आरोप गुआंगडोंग प्रांताच्या राजधानीतील अधिकाऱ्यांनी सांगितले. DPP तैवानची सत्तारुढ पक्ष आहे.चीनचे अधिकारी या सायबर हल्ल्याला थेट तैवानची राजकीय पार्टीची



फूस असल्याचे म्हणत आहेत.

चीन तैवान वाद?

चीन आणि तैवान वादाला बऱ्याच वर्षांचा इतिहास आहे.परंतू तैवानने स्वत:ला स्वतंत्र राष्ट्र म्हणून घोषीत केलेले आहे. तैवान अलिकडच्या काळात चीनपासून स्वतंत्र होण्यासाठी लढत आहे. चीन तैवानला आपला हिस्सा मानत आहे.चीनला धाकात ठेवण्यासाठी चीनने हरप्रकारे प्रयत्न करीत आहे. चीन तैवानच्या सीमेवर जाऊन युद्ध अभ्यास करीत आहे. तसे पाहिले तर तैवान बेटाला चीन नियंत्रित करतो. आणि पिपल्स रिपब्लिक ऑफ चायना या क्षेत्रास त्यांचे असल्याचे म्हणत आहे. तसे पाहीले तर तैवानला अमेरिका आणि इतर देश आर्थिक आणि लष्करी मदत करत आहेत.

आरोपावर तैवानची प्रतिक्रिया

चीनमध्ये हँकींग केल्या प्रकरणात तैवानवर आरोप झाल्यानंतर मेनलँड अफेअर्स काऊन्सिलने या संदर्भात विचारणा केली आहे. परंतू अजूनही तैवानने यावर काहीही प्रतिक्रीया दिलेली नाही. तैवानचे राष्ट्राध्यक्ष लाय चिंग ते गेल्या वर्षी सत्तेवर आल्यानंतर चीनविरोधात त्यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांच्या वक्तव्यांनी चीन आणि तैवान यांच्या तणाव वाढला

## नक्कल करण्यासाठी अक्कल हवी, कुवैतमधून ओवैसींचा पाकिस्तानवर मोठा स्ट्राइक




पाकिस्तानची अजून पोल-खोल करण्यासाठी भारताने आपली अनेक शिष्टमंडळं वेगवेगळ्या देशांमध्ये पाठवली आहेत. विविध पक्षांचे खासदार या डेलिगेशनमध्ये आहेत. जगातील 33 देशांमध्ये ही शिष्टमंडळं पाठवण्यात आली आहेत. ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर भारताची पाकिस्तान विरोधात आक्रमक भूमिका कायम आहे. कुवैतला गेलेल्या भारताच्या शिष्टमंडळात AIMIM प्रमुख असदुद्दीन ओवैसी आहेत. त्यांनी पाकिस्तानवर जोरदार हल्लाबोल केला आहे. पाकिस्तानच्या सैन्य प्रमुखांनी पीएम शहबाज शरीफ यांना एक फोटो गिफ्ट केला. त्याचा सुद्धा उल्लेख ओवैसी यांनी केला. कुवैत येथे भारतीय प्रवाशांशी चर्चा करताना AIMIM खासदार असदुद्दीन ओवैसी यांनी दहशतवादाला प्रोत्साहन देण्याच्या पाकिस्तानच्या धोरणाची निंदा केली. पाकिस्तानी सैन्य स्वत:ची भारतासोबत तुलना करण्याचा प्रयत्न करतं, त्यावरही त्यांनी टीका केली. पाकिस्तानने केलेल्या दाव्यांवर प्रश्न निर्माण केले. पाकिस्तान जे बोलतो, त्यावर कधीच विश्वास ठेवता येणार नाही, असं असदुद्दीन ओवैसी म्हणाले.

## अमेरिकेची पाणबुडी 108 वर्षांनंतर सापडली, 1917 मध्ये झाला होता अपघात

समुद्र रहस्यांनी भरलेला आहे. थोडं खोलवर गेल्यावर एक असा भाग दिसतो जिथे सूर्यप्रकाशही पोहोचू शकत नाही. या खोल समुद्रात शास्त्रज्ञांनी इतिहासाच्या पानातून बाहेर पडलेल्या अशा दोन गोष्टी शोधून काढल्या. हा चमचमीत खजिना नाही, तर कित्येक दशके समुद्राच्या कुशीत शांतपणे झोपलेल्या दोन लष्करी वाहनांचे अवशेष आहेत.1917 मध्ये झालेल्या अपघाताला बळी पडलेल्या सॅन डिएगोच्या खोल पाण्यात युएसएस एफ-1 ही अमेरिकन पाणबुडी सापडली आहे. दुसरे म्हणजे 1950 मध्ये कोसळलेले नौदलाचे प्रशिक्षण विमान. अमेरिकेच्या संरक्षण खात्यासाठी हा खजिन्यापेक्षा कमी नाही.1917 साली पाणबुड्या समुद्रात नवीन होत्या आणि नाविक त्यांच्यावर प्रयोग करत होते.

## पाकिस्तानी नागरिकांना नो एन्ट्री असताना अफगाणिस्तानला एन्ट्री, व्हिसासंदर्भात भारताचा मोठा निर्णय

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तान नागरिकांना भारतात नो एन्ट्री केली आहे. भारताने पाकिस्तानी नागरिकांना व्हिसा देणे बंद केले आहे. त्याचवेळी अफगाणिस्तानमधील नागरिकांसाठी भारताचे दरवाजे उघडे केले आहे. अफगाणिस्तानी नागरिकांना आता भारताचा व्हिसा देण्यात येणार आहे. भारत सरकारच्या 'न्यू अफगान व्हिसा' धोरणानुसार ही सेवा सुरु केली आहे. अफगाणिस्तानमधील ज्या नागरिकांना भारतात उपचार करायचे आहेत, त्यांना व्हिसा देण्यात येणार आहे. तसेच विद्यार्थी, व्यापारी,



यूएन डिप्लोमॅट यांनाही व्हिसा दिला जाणार आहे. पाच वर्ष भारत आणि अफगाणिस्तानमधील व्हिसा सेवा बंद होती. अफगाणिस्तानमधील नागरिकांना व्हिसाचा अर्ज देताना एक फोटो, पासपोर्टची माहिती, एक इतर ओळखपत्र पोर्टलवर सबमिट करावा लागणार आहे. भारताने घेतलेला हा निर्णय महत्वपूर्ण आहे. कारण गेल्या काही महिन्यांपासून भारत आणि अफगाणिस्तानचे संबंध सामान्य होत आहे. अफगाणिस्तानने भारताच्या ऑपरेशन सिंदूरचे समर्थन केले होते. पहलगाम हल्ल्याचा निषेधही केला होता. तसेच तालिबान सरकारने भारताला सांगितले की, अफगाणिस्तानच्या जमिनीवरुन दहशतवादी कारवाया होऊ देणार नाही. अफगाणिस्तानसोबत भारताचे संबंध सुधारत असताना पाकिस्तान आणि अफगाणिस्तान दरम्यान तणाव निर्माण झाला आहे. खैबर पख्तूनख्वा प्रांतात असणारे दहशतवादी, डूरंड लाइनचा वाद यामुळे पाकिस्तान आणि अफगाणिस्तान यांच्यात तणाव आहे.

भारताने पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानसोबत असलेले सर्व संबंध स्थगित केले. सिंधू जलकरार स्थगित करत पाकिस्तानी नागरिकांना व्हिसा न देण्याचा निर्णय घेतला. तसेच सीमा बंद करत दोन्ही देशांमधील व्यापारही थांबवला.

# भारत-बांग्लादेश बॉर्डरवर तणाव, दोन्ही देशांच सैन्य का आमने-सामने आलं ?

भारत-बांग्लादेश बॉर्डरवर पुन्हा एकदा तणावपूर्ण स्थिती निर्माण झाली आहे. ताजी घटना मंगळवार सकाळची आहे. आसामची सीमा बांग्लादेशाला लागून आहे. तिथे दोन वेगवेगळ्या भागात कुरीग्रामच्या बोराइबारी आणि आसमच्या मनकाछार येथे कथितरित्या भारताची बॉर्डर सिक्युरिटी फोर्स आणि बांग्लादेश बॉर्डर गार्ड आमने-सामने आले होते. मंगळवारी बांग्लादेशच्या कुरीग्राम जिल्हयात बोराइबारी बॉर्डरवर तणाव निर्माण झाला



होता. तिथल्या नो-मॅन्स-लँड भागात BSF ने 14 जणांना (पुश- इन) म्हणजे बांग्लादेशमध्ये पाठवण्याचा प्रयत्न केला. स्थानिक नागरिक आणि मीडिया रिपोर्ट्सनुसार, ही घटना बॉर्डरच्या पिलर नंबर 1067 जवळ झाली. BSF च्या जवानांनी 9 पुरुष आणि 5 महिलांना बांग्लादेशमध्ये पाठवण्याचा प्रयत्न केला. काही प्रत्यक्षदर्शींनुसार BSF कडून चार राऊंड फायरिंग झाली. BGB ने हा दावा फेटाळून लावला आहे. घटनास्थळी पोहोचून त्यांनी परिस्थिती शांततेने हाताळली. बॉर्डर पार करताना ज्या लोकांना पकडण्यात आलं, ते आता नो मॅन्स लँडमध्ये अडकले आहेत. प्राथमिक माहितीनुसार, ते सर्व भारताच्या बंदरबन जिल्ह्याचे निवासी असू शकतात. बांग्लादेशने त्यांच्या नागरिकतेची अजून पृष्टी केलेली नाही. फ्लॅग मीटिंगचा प्रस्ताव BGB चे जमालपुर बटालियन-35 चे असिस्टेंट डायरेक्टर शमसुल हक यांनी सांगितलं की, परिस्थिती नियंत्रणात आहे. गोळीबार झाल्याची बातमी अफवा आहे. बीजीबीने शांतता कायम ठेवण्यासाठी फ्लॅग मीटिंगचा प्रस्ताव दिला आहे. बातमी लिहिताना बीएसएफकडून कुठलीही अधिकृत प्रतिक्रिया आलेली नाही. तणाव अजूनही पूर्णपणे निवळलेला नाही घटनास्थळावर परिस्थिती नियंत्रणात असल्याच सुरक्षा यंत्रणांनी म्हटलं आहे. पण तणाव अजूनही पूर्णपणे निवळलेला नाही. बीएसएफ आणि बीजीबीचे वरिष्ठ अधिकारी घटनास्थळावर उपस्थित आहेत. स्थितीवर बारीक लक्ष ठेऊन आहेत.

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com